# नागरिकांची सनद
# २०१९

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग
## कार्यकारी अभियंता,
## बांधकाम विभाग, वरळी,
## मुंबई-४०० ०१८.

# सूची


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते ५ |
| २ | बांधकाम विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी | ६ ते ७ |
| ३ | बांधकाम विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयाची रचना | ८ ते ९ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | १० |
| ५ | विभागातील कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | ११ ते १२ |
| ६ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | १३ ते १४ |
| ७ | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १५ ते १६ |
| ८ | परिशिष्टे | १७ |

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या १५० वर्षाहून जास्त गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प सा.बां.विभाग मुंबई अंतर्गत अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, वरळी अंतर्गत बांधकाम विभाग, वरळी हे गेल्या ३५ वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत आहे. मुंबई या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महानगरात मुख्यत्वे करुन या विभागांतर्गत ३ उपविभाग कार्यरत आहेत (सोबत परिशिष्ठ जोडले आहे). या विभागांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या (१) दादर (२) लोअर परेल (३) गोवंडी (किरोल, कुर्ला) (४) मुलुंड (५) मांडवी येथील नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारती व त्यांच्या विस्ताराची बांधकामे करणे, दुग्धविकास विभागाकडील दुग्धशाळा/कार्यालयीन इमारती/निवासी इमारती यांचे परिरक्षण व दुरुस्तीची कामे केली जातात. पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाकडील कार्यालयीन इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे या विभागाच्या अखत्यारीत येतात.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी हे कार्यालय नविन प्रशासकीय इमारत, ३रा मजला, वरळी डेअरीच्या आवारात, वरळी, मुंबई- ४०० ०१८ येथे कार्यरत असून मुंबई, रायगड येथील नागरीकांशी बांधीलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधीलकी बांधकाम विभाग, वरळी, मुंबई या सनदेव्दारे जाहीर करत असून ती स्विकारत आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टिकोण विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

१. मुंबई व रायगड येथील कृषि/दुग्धविभाग येथील बांधकामे देखभाल दुरुस्ती, मानकाप्रमाणे करुन दर्जा उत्तम राखणे.

२. या विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या दुग्धव्यवसाय, व मत्स्यव्यवसाय खात्याच्या इमारती, नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभावीपणे करणे, सेवा व सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

३. या कार्यालयाशी संलग्न असलेल्या उपविभागीय कार्यालयांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

४. या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील उपविभागीय कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

६. या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७. या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीत विभाग/उपविभाग स्तरावर त्वरीत कार्यवाही करणे.

९. कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१०. संगणकीकरणाबाबत उपविभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. मंडळ कार्यालय, प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

११. या विभागातील आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.com** या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२ सर्व विषयाची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेचा विहीत कालावधी ठरविणे.

१३ कार्यालयांमध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१४ नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. <u>बांधकाम विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी</u>

### ◆ <u>बांधकाम विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाची बांधिलकी</u>

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना बांधकाम विभाग, वरळी, मुंबई.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील

(ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

(क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/ प्रमाणपत्रे/ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

## ◆ नागरिकांची जबाबदारी

◆ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

◆ नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

◆ नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

◆ विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

◆ सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

◆ नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

◆ नागरीकांनी कायदेशिर तरतूदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

◆ नागरीकांनी सार्वजनिक हित, एकात्मकता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## ३ **बांधकाम विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाची रचना.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प सा.बां.विभाग, मुंबई यांचे अधिपत्याखाली दि.२३/११/२०१५ च्या शासन आदेशान्वये अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, वरळी या मंडळ कार्यालयाच्या अखत्यांरीतील सर्व विभाग/उप-विभाग अधिक्षक अभियंता बांधकाम मंडळ चेंबूर मुंबई यांच्या अंतर्गत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग वरळी, मुंबई हा एक विभाग आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी यांचे अंतर्गत ३ उप विभाग कार्यरत आहेत. मुंबईतील दुग्धव्यवसाय प्रकल्प व निवासस्थाने तसेच रायगड जिल्हयातील दुग्धव्यवसाय / पशुसंवर्धन / मत्स्यव्यवसाय विभागाची बांधकामे अनिवासी व निवासी इमारतीची परिरक्षण व दुरुस्तीची कामे कार्यक्षेत्रात येतात.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी, मुंबई यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा, कार्यकारी अभियंता, व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष-तक्ता (ट्री-चार्ट) परिशिष्ट अ म्हणून सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सा.बांधकाम विभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. या विभागाशी संबंधित बांधकामाची सविस्तर माहिती या कार्यालयात मिळू शकते.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्याकडून केले जाते.

## ४. **बांधकाम विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाचे कार्यक्षेत्र.**

या कार्यालयाचे कार्यक्षेत्र मुंबई शहर व मुंबई उपनगरे / रायगड या जिल्हयात आहे. हया विभागांतर्गत मुंबई शहर व उपनगरातील वरळी दुग्धशाळा, मातृदुग्धशाळा कुर्ला , खोपोली व महाड दुग्धशाळा येतात. तसेच या विभागांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागातील सर्व प्रकारची बांधकामे, अंशदान ठेवी अंतर्गत विविध विभागाची कामे,उच्च तंत्रशिक्षण विभागाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची मुंबई शहर व उपनगरातील कामे हाती घेण्यात येतात.

## ५. विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.

### अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

बांधकाम विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयाकडे ना-हरकत प्रमाणपत्रे, रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही होत नाही.

**ब) <u>माहितीची सुलभता</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.com** या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**क) <u>खाजगीकरण</u>**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठया प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग बांधा, वापरा व हस्तांतरीत करा, या तत्वावर सुरु केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासन स्तरावर ठरविले जाते.

## ६. गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी

### (अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण

विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदा. उप विभाग कार्यालयाच्या विरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास या कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे. विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्याकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणे/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यांत येईल. गाऱ्हाणे/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ई मेल व्दारेही नागरिक मांडू शकतात.

**(ब) <u>नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन</u>**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा बांधकाम विभाग, वरळी, मुंबई, अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**(क) <u>जनसामान्यांकडून सुचना</u>**

या मंडळाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वतःहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सा.बां. विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ७. <u>नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

बांधकाम विभाग, वरळी, मुंबई च्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दि.१ जून २००७ पासून करण्यास हे विभागीय कार्यालय कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

बांधकाम विभाग, वरळी, मुंबई खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकारण करण्यात येईल व तक्रारशून्य सेवा असल्याची खात्री करण्यांत येईल.

## ८. परिशिष्टे

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता (**Tree Chart**)

ब) कार्यक्षेत्राचा नकाशा

## प रि शि ष्ट - अ

**कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी, मुंबई अंतर्गत वृक्ष तक्ता..**

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग, वरळी, मुबई-४०० ०१८.**

**उप अभियंता,**
**कृषि बांधकाम उप विभाग क्र.१०**
**वरळी, मुंबई-४०० ०१८.**

**उप अभियंता,**
**कृषि बांधकाम्उप विभाग क्र.११**
**वरळी, मुंबई-४०० ०१८.**

**उप अभियंता,**
**कृषि बांधकाम उप विभाग क्र.१५,**
**कुर्ला, मुंबई-४०० ०२४.**

# प रि शि ष्ट - अ

## कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी, मुंबई अंतर्गत वृक्ष तक्ता..

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग, वरळी, मुबई-४०० ०१८.**

| | | |
|---|---|---|
| उप अभियंता,<br>कृषि बांधकाम उप विभाग क्र.१०<br>वरळी,<br>मुंबई-४०० ०१८. | उप अभियंता,<br>कृषि बांधकाम उप विभाग क्र.११<br>वरळी,<br>मुंबई-४०० ०१८. | उप अभियंता,<br>कृषि बांधकाम उप विभाग क्र.१५,<br>कुर्ला,<br>मुंबई-४०० ०२४. |